# बोदवड महाविद्यालयात संस्था चालकांचा सन्मान सोहळा संपन्न

(16.10.19) कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बोदवड येथे दि 16.10.2019 रोजी दि बोदवड सार्वजनिक को ऑप एज्युकेशन संस्थेच्या चेअरमनपदी मा मिठुलालजी अग्रवाल, व्हा चेअरमनपदी मा अजयजी जैन, सचिवपदी मा विकासजी कोटेचा यांची व सर्व सचालक यांची 2019 ते 2024 या कालावधी साठी बिनविरोध निवड झाल्याबद्दल महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर परिवाराद्वारे सत्कार व सन्मान सोहळा संपन्न झाला प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य अरविद चौधरी यांनी प्रास्ताविक करून सर्वांना शुभेच्छा दिल्या व महाविद्यालय परिवारातर्फे मा संस्था चेअरमन, मा व्हा चेअरमन, मा सचिव व सर्व संचालक याचा सन्मान केला

या प्रसंगी मा मिठुलालजी अग्रवाल यांनी सर्व संस्था सदस्यांनी बिनविरोध निवड केल्या बद्दल धन्यवाद देऊन सर्वांच्या सहकार्याने महाविद्यालयाचा विकास करू असे आवाहन केले

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ गीता पाटील यांनी तर आभार उपप्राचार्य डी एस पाटील यांनी मानले कार्यक्रमास संस्था सचालक मा प्रकाशचंद्र सुराणा, मा श्रीराम बडगुजर, मा विजय कोटेचा, मा श्रीकृष्ण कुलकर्णी, मा विजय जैन, मा आनंद जैस्वाल, मा रमेश जैन मा महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते










